ॐ

सुफलपुष्पें प्रसविणारी । यशःश्रीलाभ देणारी
त्रिलोकीं राज्य करणारी । शाहिरी वैखरी गहिरी

विविध–पद्य–माला, पुष्प ८ वें.

# मधुसंचय

मधुसंचय हा केला मधुपानीं रसिकवर ! उद्दश यास्तव
तृप्त रसिकजन होता वाढे कर्त्यासि धन्यता, तोष.


संग्राहकः—
श्री. वासुदेवसुत कारेकर



९२८
श्री. क्र. ८०३०



प्रकाशकः—
श्री. माधव गोपाळ कुलकर्णी, वाकरेकर
कवि–मंडळ, कोल्हापूर.



RFBK-0004730



ग ठकार, श्रीसिद्धेश्वर प्रेस, कोल्हापूर.

शके १८५४ ] किंमत ६ आणे [ इ. स. १९३२

# आभार.

'मी तों वाहीं भाराचि साचा'

श्रीवागीश्वरीच्या कृपेनें आणि रसिकांच्या व कवि–कवयित्रींच्या सक्रिय सहानुभूतीनें 'वि. प. माले' चें ८ वें काव्यपुष्प जनताजनार्दनाच्या हातीं देण्यास आम्हास आनंद होत आहे.

प्रस्तुत काव्यपुष्प छापत असतां अनेक मित्रांच्या सूचनेवरून यांतील 'शतोपदेश,' ७ वें काव्यपुष्प म्हणून वेगळा प्रसिद्ध करणेंत आला आहे. तसेंच यांतील कांहीं कवींच्या कविता मंडळाच्या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या 'काव्यकथा' वगैरे पुस्तकांतील असून तीं पुस्तकें शिल्लक नसल्यामुळें पुनर्मुद्रित केल्या आहेत.

या पुस्तकाच्या कामीं श्री. माधव गोपाळ कुलकर्णी व श्री. वैद्य कापशीकर यांचें मला अमोल साह्य झालें आहे. त्याबद्दल त्यांचा, तसेंच या पुस्तकांत ज्या कवि व कवयित्रींच्या कविता आहेत त्यांचाही मी अत्यंत ऋणी आहें.

शेवटीं,

'ममत्व तव जाणुनी विनविलें.'

वटपौर्णिमा, शके [illegible]८५४
कोल्हापूर, ता. २[illegible]३२

संग्राहक,
बाबूराव वासुदेव कारेकर.

---

## कवि–सूचि.

१ कै. सौ. रंगुताई वैद्य
२ सौ. राधातनया
३ श्री. वासुदेवसुत
४ श्री. मधुमाधव
५ श्री. वैद्य कापशीकर
६ श्री. रा. आ. भिसे
७ श्री. वि. म. म्हेत्रे
८ श्री. अनंतराय
९ श्री. रामानुज
१० श्री. कमलाग्रज
११ श्री. य. ल. पार्सेकर देसाई
१२ श्री. ना. कृ. भूतकर
१३ श्री. प. भा. कुलकर्णी
१४ श्री. अनंत ओगले
१५ श्री. सदाराम
१६ श्री. मु. श. देशपांडे.

# मधु-संचय

## चैतन्यबोल

( चाल—मसि बोलुं. )

हें जगणें कसलें !—भेरींतूनी साग काढुनी बोल !
मोह, माया नष्ट व्हाया
'कोण मी ?' हें मज कळाया
तूं काढ काढ त्या भेरींतूनी चैतन्याचे बोल.
भीति भरली या शरीरी
ससृतीची ये शिसारी
ती भरुनि जावया भेरींतूनी काढी अभिनव बोल.
शृखलेने धेरुनीया—
टाकिलेल्या बधु—काया
त्या स्वतत्र व्हाया भेरींतूनी काढी वरिमरि बोल.
बंधु पोटार्थि जे फिरती
अन्नपाण्यावीण मरती
ते सजीव व्हाया भेरींतूनी काढी उद्यमि
वस्तुमात्रावरील सत्ता—
जाउनीया बसति लाथा
प्रतिकार कराया भेरींतूनी काढी बलयुत
राष्ट्रकार्यी शक्ति साची—
भंगली जीं मनें अमुचीं
तीं एकवटाया भेरींतूनी काढी प्रेयस बोल
धूर जेथें काचनाचा
तेथ निघतो कोळशाचा
तू अजन घालीं भेरींतूनी काढुनि स्मृतिचे बोल
प्रेतमात्रीं जी न दिसली
शातता ती जीवि भरली
हें जगणें कसलें !— भेरींतूनी साग काढुनी बोल.

REFBK-0004730

## कंकण-रव

( दिंडी-स्वनित )

विरहतापानें तप्त एकदा मी—होउनीया बैसलों शून्य धामीं
कमलदेही येईल प्रिया आता। शांत माझ्या ती करिल तप्त चित्ता
तद्रिमाजीं लागली जिवा झोंप। तिच्यावरचा हृदयात वसे कोप
सुप्त होतों मी स्वप्नास्थितीमाजीं। होय कंकणरव ऐकुनिया राजी
प्रिया जवळीं पातली असा भास। रवा ऐकुनि त्यावरी होय खूष!
" प्रिया अपराधी जवळ उभी आहे। महाराजा! तू सदय मला पाहें!"
उठुनि बसतों तों चंद्रप्रकाशात। मनी मांजरे मज दिसे रव करीत!


---

## चंद्रोदय

( चाल-भूपती खरे )

हा उदासीनता सोडुनि द्‌ लवलाहे।
चंद्रमा उगवला उठुनी सत्वर पाही
रे भरती आली नदिपतिला या वेळीं
लागला वहाया पवन देत आरोळी.
तू तारू अपुलें नांगरून बसशील
तर नाश तुझा तूं करुनि खास घेशील.
हतवीर्य होउनी ना बसता या समयीं
कर्तव्य आपुलें करुनी हो दिग्विजयी
बघ दाहि दिशाला तेज फाकलें कसलें
भ्रम निद्रा सोडुनि पाहीं उघडुनि डोळे
जग कसें चाललें पुढें, करू मी काय?
निःश्वास सोडसी असे कसे हे ? हाय!
चुकलासी जागा, तुझी असे तुजपाशीं
चंद्रमा उगवला उठुनी पाहीं शीघ्रीं.

—वैद्य कापशीकर.



## श्रीगणेश–प्रार्थना.

श्रीगजमुख ! मोहपटल दूर करीं, तारीं ऽ ऽ
शरणागत दास दीन । पदिं विलीन रात्रंदिन
नाम जपत तव भगवन् । भवजलभय हारीं ऽ ऽ
आप्त, इष्ट, पुत्र, पौत्र । धन, दारा, वस्त्र, पात्र
रोग, दुःख, घोर फार । सतविति संसारीं ऽ ऽ
व्याप नको, ताप नको । मृगजलवद् भोग नको
दृश्यमान भास नको । दे पदिं रति भारी ऽ ऽ
काम, क्रोध, मद, मत्सर । लोभ, मोह रिपु भयंकर
संकट हें प्रभु निवार । ये शर्णिं हितकारी ऽ ऽ
ज्ञानसुधा अर्पुनिया । शांतिसुखा वितरुनिया
आत्मरूप दावुनिया ! जनन मरण वारीं ऽ ऽ

## आमचा स्वामी.

स्वाभिमान सोडूं कैसा । बेइमान होऊं कैसा? ॥ करु कसें ?
जें वडिलादिकिं नच केलें । मी त्यास धजू तरि कैसा ? ॥ करु कसें ?
आजवरी खाल्लें निमक । त्या हराम होऊं कैसा ? ॥ करु कसें ?
चाकरी जयाची केली । स्वामिस त्या सोडूं कैसा ? ॥ करु कसें ?
मी कोण ? । शिवाजी कोण ? । स्वामि तरि कोण ?
मूढ हें चुकलें । हृदय हें गोंधळुन गेलें ! ॥ करु कसें !
शिर करीं धरूनी लढले । सिंहांचा त्या मी छावा ॥ वीरसा
देशास्तव दिधले प्राण । चालवी तयाच्या नांवा ॥ मी असा
निज आयाबहिणी, धर्म । रक्षिती देउनी जीवा ॥ पूर्वज

मराठ्यांत । सळसळे रक्त । तेंच जोमात
मी न डरणारा । निज धर्मास्तव मरणारा ॥ मी असा !
करि कार्य शिवाजी हेंच । धर्माचें पाळण साच ॥ आजला
रक्षी निज आयाबहिणी । रक्षी गो-विप्रालाही ॥ आजला
हे अविंध छळिती भारी । उद्ध्वस्त मही ही सारी ॥ आजला
म्हणुनिया । येउनी दया । झटे आज या-
महाराष्ट्रात । करण्या दुर्जन-निःपात ॥ शिव असा !
विश्वास न एकावरतीं । सारांक सदोदित चित्तीं ॥ यवन हे
करु ब्रह्मकर्म नच देती । गोमाता चरचर चिरिती ॥ यवन हे
अबलाची इज्जत घेती । घ्यावया, न लव नयनीति ॥ यवन हे
ऐशास । म्हणावें खास । स्वामि कैशास ?
शिवाजी राणा । हा स्वामी अमुचा जाणा ॥ यापुढें !

—वासुदेव-सुत, कारेकर.

## घटिका.

मी घटिका घालुनि बसलों आहें येथें
किति घटका होता भेटणार जीवातें
या कायापात्रीं प्रेम खरी ही घटिका
पाडुनी काळजी-छिद्र सोडिली रसिका !
स्मृति-जीवन तव मी ओतुनिया पात्रात-
संदेश कळाया घटिका सोडुनि त्यात-
चिर बसलों आहे. घटिका बुडते तोंच-
काढुनी तियेला पुन्हा सोडितों साच.
मम जीव-बिंब तें पडता जीवनहृदहीं
आकर्षिसि गमतें मजला तू त्या समयीं
मम बिंब नव्हें, तें बिंब तुझें मज दिसतें
या रूपें न कळे भेटिसि कां जीवातें
शोधितो सुवर्णा जेंवी शारी, तूतें-
मी घटिका घालुनि बसलों आहें येथें.

## टीकाकारास—

जेथें भाव गुलाब नित्य फुलती त्या अंतरीं कोठुनी
द्वेषा–मत्सर–आदिकांस रसिका ! जागा मिळावी कशी ?
नाना दुष्ट विकार तेथ दिसती दृष्टीस तूंतें महा
होते काय बरोबरी बघुनियां अंत:परीक्षा खरी ?
बाहेरून रुबाबदार दिसती जे चेहरे सात्विक
अर्ता स्वानुभवें कळून चुकते कीं ते विषारी किडे !
जैशा ज्या दिसती तशाच असती सृष्टींत वस्तू जरी
होती ना कसले अनर्थ कधिंही पोटात त्या जाउन !
येथोनी रसिका ! खुशाल शिरुनी पाहा तरी अंतरीं
येती हातिं खरोखरींच तुझिया गोष्टी मनीं आणिल्या ?
अंत:सागरिं डुबता न, म्हणशी का बा वरी राहुनी ?
द्वेषा–मत्सर–मत्स्य–कूर्म दिसती रत्नाविना सर्वही !
बाह्यीं गंभिरता अवश्यक असे लोकांत राहावया
देता सोडुनि तों, छळेल कुणिही पाहोनि जीवास या.
—वैद्य कापशीकर.

## हात आवर ! हात आवर ! !

आवरीं आवरीं हात अधमाधमा । नातरी कलम तो करिन नीचोत्तमा !
भूप निज धर्मिचा म्हणुनि का माजला ? । सम परी सर्वचि स्वप्रजा त्याजला
कुणि न तुमची अशी जात तत्श्रुतिपथा । म्हणुनि नगा तुम्ही नाच हा घालितां !
जरि असे बल तरी चाल करिं मजवरी । सोड दुबळी खला ! गाय ही सत्वरी
धर्म तरि काय तव गो–वधा सांगतो । मार्ग कांते आचरिसि लाभ तरि काय तो ?

## माझे वैभव

भिकारी मला बाहसी काय लोकीं ? । सदा साधनीं स्वल्प संतुष्ट जो कीं
प्रभूच्या कृपें सिद्ध हो पाहिजे तें, । तुपेक्षी प्रभू वर्तनें थोर त्यातें !
हवा स्वच्छ ही, स्वच्छ सूर्यप्रकाश, । तसें स्वच्छ पाणीहि सेवावयास
नसे रोगही, नित्य आनंदवृत्ति, । जगत्संपदा यापुढें तुच्छितों ती !
सदाचा मला मोददायी वसंत, । झरा मंदवाही करी चित्त शांत,
निसर्गी मिळे सर्वही सौख्यठेवा । विलोभ्या मनीं स्वप्निंही जो न ठावा !

वनीं गर्द राईंत वा आश्रमात, । समाधानवृत्ती सदा मन्मनांत,
धनानें अशी का मिळे सौख्यशांति ? । मला यांहुनि पाहिजे काय जास्ती?
दिले हस्त हे, पाय हे दास देवे । जिथें जाय मी, हे सदा सज्ज सेवे;
अरण्यीं, नद्यापर्वतीं हिंडताना । मला सार्वभौमा मनाई कुठें ना !
सगेसोयरे, मित्र होती धनाहीं । पुसेना कुणी निर्धना त्या मनेंही;
पहा मित्र माझे सदाचे फुकाचे । अहा संत हे, हे कवी, हे जिवाचे !
मला दाविती मार्ग हे तत्त्ववेत्ते । दुरी सारिती मोह माझा स्वरें ते
मला सत्यकर्मास हे धैर्य देती । मना पापबुद्धी कदा ना शिवे ती !
क्षमाशील मी, धीर मी, स्वाभिमानी । विशुद्धात्म मी दौलती तुच्छ मानीं
अशाला कसा बोलसी तू भिकारी ? । करीं साफ जा दृष्टि आधीं विकारी !

—वासुदेव- सुत, कारेकर.

## उपहासें मी मेलों !

मम हृदय उकलुनी दावाया तुज आलों
तव सदनीं येता उपहासें मी मेलों !
जी एकांतीं मी बसुनी केली सेवा
ती तुला अर्पुनी प्रसाद मग वाटावा
हें धरुनी हृदयीं जवळीं आलों असतां
तू तीर मारिला करावयाला घाता !
मृग धावत फिरतो जवळ कस्तुरी असुनी
जगीं ठेंचा खाई अननुभवी, अज्ञानी !
नीचतेवाचुनी ये न उच्चता जगतीं
तू धडा शिकविला मजला धरुनी हातीं
मम पराधीनता दूर अशी तू करितां
मज दृष्टि लाभली खरी तुझी भगवंता !
मी लाथ खाउनी शिखरीं उच्च जरि चढलों
तव सदनीं येता उपहासें मी मेलों !

## दारा आडून—

मातें दात पडून वृद्धपण सें येतां अकालीं महा

मार्गी आणि घरात मित्र करितीं भेटींत ऐशी, चहा—
सौंदर्यात सुरूपता चमकते शुक्राप्रमाणें मुखीं
कोणा खैबरखिंड ही गमतसे मी हांसतां ती महा !
आता लौकर दात घ्या बसवुनी येतील पाहावया
तेव्हा सुंदरता हवी दडविण्या ही गोष्ट ध्यानीं धरा.
झालें लग्न असेल हो तर उद्यां होणार तें हो कसें ?
वृद्धाला तरुणी— जसा दिसतसे हत्तीस अंकुर सी.
येतां मी फिरुनी घरातिल मुलें घेऊनियां बैसलों,
' काका बोलुं नका, मुळीं हसु नका, देवाप्रमाणें बसलों,'
कां मी बोलु नये, मुळीं हसु नये, सांगा मुलांनो ! जरा
कोणी तोंच मला समोर अयना केला पहाया खडा !
मातें खैबरखिंड तोंच दिसली, बाळें दुरी जाहलीं
दारा आडुन येउनी बिलगली कां ती कळे ना परी !

—वैद्य कापशीकर.

## आता तरि उघडीं डोळे !

ऊठ ऊठ हिंदुसमाजा ! । आता तरि उघडीं डोळे !
किति काळ सुस्त पडुनीया । बघणार पराचे चाळे
तजदेखत तव ललनांना । हूलविती नीच हे सगळे
मंदिरेंहि करिती भ्रष्ट । तरि अजुनि तुझें मन भोळें
सरणार कधीं झापड ही ?
का बनसी भागूबाई ?
तें सत्व कुठें तव जाई ?
धर्मास्तव पूर्वज तव रे । शिर करीं घेउनी लढले
व्यक्तिव्यक्ति मिळतां मिळतां । होतो संघटित समाज
व्यक्तिव्यक्ति निघुनी जातां । कधिं राहिल काय समाज
राखिता आजचा क्रम रे । नामशेष होशिल सहज
साम्राज्य जगावर ज्यानें
गाजविलें बहु अभिमानें

त्या तुला कसें अवमानें—
दाटेल बरें या बद रे। कां तुघडिसि अजुनी डोळे ?
झालें तुज काय असें हें। कसली तुज पडली धास्ती ?
का नाहीं त्राण तुझ्यात। जिरविण्यास अरिची मस्ती ?
का घटापरि आजी तू। भरलीस ककणें हस्तीं ?
नससी का हिंदुबिजाचा ?
अभिमान न का धर्मांचा ?
तू वंशज ना रे त्याचा—
धर्मास्तव ज्यानीं दिधले। स्वप्राण, न लव जे डगले !

## बंदीवानाचे उद्‌गार.

तुज हवा देह, घे, घेउनि बैस खुशाल,
मन सदा मुक्त मम, कदा न तुज गवसेल !
येत का कुणा बांधण्या मोट वाऱ्याची ?
मृगजळामागुतीं धावे फजिती त्याची !
फसवुनी जरी हा देह तुवा आकळिला,
निर्मनि मनिं जरी अगणित निमिनिमिषाला !
तव सत्ता या मम एका देहावरतीं,
मम सत्ता चाले अमित जनमनावरतीं !
तू देहबाहुली एकचि मम नाचविसी,
स्थिति हलवी मम किति हृदयें, सीमा न कशी !
जें मला वाटतें सत्य तेंचि वदणार,
वरिन मी मरणही, विधर्म नच वरणार !
करणार काय तें घेईं करुनि खुशाल,
मन सदा मुक्त मम, कदा न तुज गवसेल !

—वासुदेवसुत, कारेकर.

## उद्धरेदात्मनात्मानम्.

बघ जरा निसर्गाकडे तरी। का तुला निराशा अशी वरी
'होणें माझ्या काय हातुनी'। ध्रुवपद दे हें त्वरित सोडुनी

येइ वरी रवि तिमिरांतूनी । बघ तुला शिकवितो काय तरी ?
पिंपळ उगवे कुठें तरी तो । पाषाणातुनि तोंड काढितो
उन्नति करुनी अपुली घेतो । बघ तुला शिकवितो काय तरी ?
कभिन्नकाळे खडक फोडुनी । आत्मबलें ये निर्झर भुवनीं
नदनवनसम बनवी धरणी । बघ तुला शिकवितो काय तरी ?
वृक्ष होतसे बीजापासुनि । हिमउष्णाचा ताप सोसुनी
फल-पुष्पानीं जाय उद्धरुनि । बघ तुला शिकवितो काय तरी ?
अनत सागर विशाल भूधर । साग कुणाच्या तो जीवावर ?
रत्नें मिळवी सतेज सुदर । बघ तुला शिकवितो काय तरी ?

## तुझ्या दारीं !

तुझ्या दारिं भिक्षेकरि हा उभा तिष्ठताहे
भीक कधीं घालिशि नकळे म्हणुनि बाहताहे
वेळ--अवेळाची नाहीं जाणिवता देहीं
दिवस रात्र मागत बसणें काम हेंच पाहीं
सतत यत्न केल्यावरती काय साध्य नाहीं ?
वरुनि खालिं गगामाई भूमिवरी येई.
दैव असो अनुकुल याला नसो तरी येथें
काम चिकाटीने करिता तेंच मदत देतें
सनदशीर चळवळ दारीं करित राहुनीया--
घालशील तितकी भिक्षा पदरिं घेउनीया-
काम करित बसणें दिसतें उचित तुझ्या गेहीं
निर्बलास याविण दुसरा मार्ग भला नाहीं !
भीक असे हक्काची जी तीच मागताहे
तुझ्या दारिं भिक्षेकरि हा उभा तिष्ठताहे,

## तोड ही बेडी !

तूं टाक तडतडा तोडुन चटकन् बेडी
सुरवंटरूप टाकून, स्वराज्या जखडी
स्वातंत्र्य मिळव तू युद्ध करुन कायमचें

दे झुगारून तूं टरफल बीजावरचें
गुंतून जाउं तू नकोच मायेमाजीं
लोभास होउं तूं नकोस कसल्या राजी.
स्वातन्त्र्य मिळविण्या जाता कांहीं आड–
जे काटे येतिल, ते तू त्वेषें काढ.
काढतां मरण जर त्यामाजीं येईल
श्री गळा तुझ्या ती विजयमाळ घालील.
जी तुझ्याभोंवती पडलेली अडगळ ती,
फेंकून देउनी, मिळव तुझी श्री अंतीं.
काळानें घरिली नसे जोंवरी नरडी
तू टाक तडतडा तोडुन चटकन् बेडी !

—वैद्य कापशीकर.

## आमची सम्राज्ञी.

तूच आमुची सम्राज्ञी, नमो हिंदभूमि !
तुझ्यावीण कधिंही कोणा शिर न लववु आम्ही !
तूच अन्नपाणी देसी, तूचि पोशितेसी,
तुझें निमक खाउनि बेबू कधिं न आणिकासी !
थोर तुझ्यासम नच कोणी अन्य या त्रिलोकीं,
परहि तुझे नौकर बनुनी रावती विलोकीं !
उच्च नीच वा निज पर हा विसरुनिया भाव,
पदनतास आश्रय देणें हाच तव स्वभाव !
लीन होउनी जे येती तुझ्या पदीं दास,
त्यासि त्यासि चढवीसी तू उच्च गे ! पदास !
अंकि तुझ्या निर्भयतेनें पहुडतों सदाही,
तुझी मायपांखर असतां भिऊ ना यमाही !
पूर्ण कृपा ठेवीं सतत, तुझी प्रजा आम्ही,
तूच आमुची सम्राज्ञी, नमो हिंदभूमि !

—वासुदेवसुत, कारेकर.



## बालमोद.

कसाहीं कुठेंही असो कोणि पाहीं । सदा गोडि आणी, कटू ना कुणाही
अशी गोडि ही बालदेहांत आहे । सदा प्रीय सर्वां, तसा अन्य नोहे
कुणा नावडे-वावडे यांत नाहीं । सदा आवडेसा सदां मोददायी
अशी गोडिही सानुल्या देहिं आहे । गमे ईश-सत्ता उभी मूर्त देहें
कुणीही हिचा सान दृष्टांत देता । कुवस्तूहि त्या मोद देतात चित्ता
असा हा वसे बालदेहात मोद । नये आणिकें तो खरा हाच बोध
पहा बाल वा कोमला वस्तु नेत्र । अहू त्रस्तही शांत होतात गात्रें
मनीं मोद साचे सुखें डोल येती । बुझे खेद तो होय तल्लीन वृत्ती
पहा बाल-पश्वा पहा बाल पक्ष्या । पहा बाल-वल्ल्या पहा बाल-वृक्षा
पहा बाल-पर्णा पहा बाल लीला । पहा बाल्य-वर्णा पहा बाल-बाला
पहा हो कशाही सुवेळा अवेळा । स्वयें देति सर्वा सुमोद स्थलाला
जसा बाल-देहीं तसा बाल-शब्दीं । वसे मोद जो तो जना लावि नादीं
पहा बालके नांदतीं जेथ तेथें । वसे मोद तो सर्व एकाच थाटें
पहायास आनंद त्या बाल लीला । दिसे मायबापां खरीं मोद वेळा
जरी डोलर्ली माय बापें सदाही । दिसे प्रेम तें त्यांत आश्चर्य नाहीं
मुदें डोलती येति जातीहि लोक । वसे चोज हें थोर येथें त्रिलोक

असो दुष्टही त्या इथें मूल येते । असो मत्त प्राणी तया मोहवीतें.
वसे मोद, सत्ता खरी बाल देहीं । दिसेना अशी ते कुठें धुंडिताही।
बहू आवडे बाल हें पाहि सर्वां । जरी जाय वेळा तरीं नाहीं पर्वा
मिळे मोद तो टाकवे का कुणातें । जडे प्रेम तें तोडवेना स्वहातें
—मधुमाधव.

## प्रदर्शन !'

[ राहत्या शहरात नित्य दृष्टीस पडणारें शेतकरी-प्रदर्शन पाहून, निःशस्त्र जीव, काय मदत करणार ?' तो क्रोधाला अक्रोधानेंच जिंकणार ! ]

बैल जोडुनि गाडीस गाडिवान । नगरिं आला घेऊन नवें धान्य
जशी विक्री व्हावया हवी होती । दलालाच्या भेटींत जाइली ती
बैल जोडुनि गाडीस गाडिवान-- । घरीं जाण्याला निघे म्हणत गान।
तोंच त्याला पोलीस हाक मारी । उभी गाडी तू जल्द करीं द्वारीं
गाडिवानाच्या हाक ये न कानीं । पळत होते झोकात मुके प्राणी
ओढ घरची बैलासही मन्यास । कशी यावी ऐकण्या हाक त्यास ?'
उभी गाडी केली न म्हणुन राग । बहू आला पोलिसा, होय नाग !'
दश केला गाडींत चढुन त्यानें । कस शब्दीं ते उठवु लेखणीनें !'
जशीं कणसें हुरड्यास तीं अणोनी । चार्ली दाणें पाडिती झोडपोनी
तस केलें बेजार मारुनीया । अहह ! गरिबा त्या तुडवियलें पाया
नगरपालक पातला तोंच त्यानें । आणि मारियेलें पुन्हा कोरड्यानं।
गरीबाचा करणार न्याय कोण ?' । नसे मालक या जगीं प्रभूवीण !
अश्रु गाळीत बैठीस गाडिवान । मुकाट्यानें तो परत जाय दीन
असुनि सर्वांचा शेतकरी प्राण । आज शेणाहुनि होय परी हीन !'
—सौ. रमूलाई वैद्य।

## साफ मुजरा करणार मी न आई !'

इट्ट बाबा धरतात का म्हणून । सांग आई ! तू तयां समजवून
नको मजला दरबार पाहणेंही । साफ मुजरा करणार मी न आई !'
सांग आई ! नमिन मी तव पदातें । सांग आई ! नमिन मी गुरुपदातें
देवधर्महि मज पूर्ण शिरोधार्य । नमन इतरां मम नव्हे इष्ट कार्य
पूज्य गो-माता असे देवदेवा । तिच्या घेती हे शिखानष्ट जीवा।

हिंदु पाहुनि छळितात त्यास भारी । असे राजे हे मला गमति वैरी
व्यर्थ रयते नाहि तो काय राजा ?। धर्मविध्वंसक तरी कसा राजा ?
हे त उचलिन मी अशा नमायान । हात उचलिन करण्यास हात दोन
लात तरि ते करितात का अशाची । नौकरी गे ! घातकी पातक्याची
नौकरी मी करिन ना कधीं साच । स्वता स्थापिन मी राज्य वेगळेंच ,
म्हणुनि म्हणतो जाणार मी न आई । करुनि घ्याया अपमान अशा ठायीं
जरी नेले तरि लव न लवविणार । अविंधाच्या मी पुढें कदा मान !

—सौ राधातनया.

## घटा !

पराहातीं सोडून कसे जाऊ ? । जीवहंसा ! घालीत अश्रु न्हाऊं !
चुकुनि पडता पाऊल वक्र बाळा ! । पहायाची ये अशी आज वेळा !
मधू होता जोंवरी जीवनात । भ्रमर आला मजजवळ गात गात
मधू सरुनी जाताच हा प्रसंग । जिवा लाजुनि तो तात, सोडि संग !
नये येऊ तो समय क्रूर आला– । डाव उलटा पडताच जनीं बाळा !
नको बाळा ! रडु नको उगा राहीं । फुटे पान्हा बघ एक घोट घेई !
तोंच घटा वाजली गवाक्षांत ! आणि तान्हें घे करीं देवदूत !

—सौ रंगूताई वैद्य.

## पुरे लपंडाव !

तुझ्यापायिं शिणले भारी, नको लपंडाव,
किती अंत बघशी अजुनी कशी येन कींव !
तुझ्यासाठिं केलें मीं रे जिवाचें कि रान,
जीव होय हा हैराण, कसा भेटसी न !
हरणकाळजी लागूनी मनीं झुरत आहे,
वाट पाखराचाणी मी तुझी पाहताहें !
कुठें गुंतलासी सखया ! कसा विसरलासी,
उतावीळ भेटीला ही होय नम्र–दासी !
तुझ्यासाठिं संसारी मीं सोडियले पाणी,
आप्तधाम सोडुनि आलें वनीं चक्रपाणि !
असुनि नजिक दडुनी बससी काय यदुराया,

येई येइ बन्सीधर ! ये, वाहिन ही काया !
साधिभोळि राधा मी ही, मज न पेंच डाव,
त्वरित धाव माधव ! येई, पुरे-लपडाव !

—सौ. राधाताया.

## दिपवाळी !

माते बधु सहा स्वराज्यसदनीं–माहेरिं माझ्या गुणी
गेला त्यांतिल एकला मजवरी प्रीती जयाची ऋणी–
अद्यापी नवमास जाउन जया झाले न लोकीं पुरे
यदाची दिपवाळि ही बघुनिया अंगी भरें कापरे !
गेलेली दिपवाळि ये मजपुढें ओवाळितां बधुना
जेथें बधु सहा सुजाण दिसले त्या ठायिं पांचाजणा–
ओवाळून स्मृतीस उज्ज्वल करी पचारती मत्करीं
यदाची दिपवाळि ही टपटपा ढाळीत अश्रू घरीं।
बधुची हलुवार घेउन मुलें ओंवाळणी घेतली
तेथें तीं बसलीं मुलीं न वदता जोडूनिया अंजली !
भाऊ ! रूप तुझें बघून असलें आईस ये फेंपरें
यदाची दिपवाळि ही बघुनिया सर्वां भरें कापरें !
यंदाची दिपवाळि ही लिहियली माझ्या नशीबीं अशी
उद्याची दिपवाळि ठाउक कुणा आहे नशीबीं कशी !

——सौ. रघूताई वैद्य.

## खाऊ !

तात चर्चा सोडून पान खाया । बसत असता जणु मौज ती पहाया
वदत नातू पातला ' भाउ ! भाऊ ! । मला द्याना तो मऊ मऊ खाऊ '
विश्वनाथा ! तू असासि अज्ञ बाळ । कसा खाऊ मग तुला हा मिळेल ?
उद्यां अमुच्यासम होसि जधीं मोठा । तधीं खाऊचा काय तुला तोटा '
बाळ चर्चा तत्क्षणीं घेउनीया । हसत मेजावर उभा राहुनीया
पहा ! भाऊ ! मी दिसत किती मोठा । तुम्ही द्याना का खाउ मला आता !'
करीं धरुनी मुख चुंबितांच 'भाऊ' । हाच तो का मज दिला गोड खाऊ ?'

—सौ. रघूताई वैद्य



**प्रार्थना.** (गज्जल)

भक्ती तुझी करीतों । रात्रंदिनीं दयाळा
कल्याण होय अमुचें । ऐसें करीं कृपाळा
शत्रू घरीं शिरोनी । आम्हांस स्थानभ्रष्ट
संपत्ति नेउनीया । केलें असे कनिष्ठ
शैलावरून श्रीच्या । लोटोनिया अम्हांला
जागा रिती न ठेली । सदनीं फिरावयाला
दु:खाब्धिं टाकुनीया । शत्रू अजिंक्य ऐसा
तो आजला जहाला । अमुच्या घरील राजा
अमुचें हिरोनि सारें । घाली वरीहि घाला
देशोधडीस आम्हा । लावीयलें दयाळा
अमुच्या मुलास आता । तें सर्व या मिळावें
पूर्वी समान आम्ही । ऐश्वर्यवंत व्हावें
संपत्ति, कीर्ति सर्व । जय, शक्ति पूर्वजांची
पसरोनिया, मुलास । जागा मिळो तयाची
अधिकार, उच्च जागा । आम्हास प्राप्त व्हावी
राष्ट्रातल्या जिवांची । दैना दुरी करावी
कल्याण-योजना तू । घडवून आण ऐशी
कर जोडुनी जिजाई । करि प्रार्थना प्रभूसी.

—वैद्य कापशीकर.

जिजाई व शिवाजी. (चाल—प्रतिकूल.)

“ वडिल थोर याना देणें मान लहानानीं,
नियम आजवरि पाळियला आर्य पूर्वजानीं !
पितृवचन पाळायास्तव राम वनीं जाई,
ऐकिलेंस रामायणिं हें, उमज कशी नाहीं ?
भीष्म पित्यासाठीं राही सदा ब्रह्मचारी,
पढवणूक भारतिंची ती व्यर्थ काय सारी ! ”
“ मीहि पित्यासाठीं आई ! काय करूं बोल,
कापुनिही शिर ठेविन हें पादिं न काळ वेळ !
सांगतात ‘ दरबाराला ’ परी चल म्हणूनी,
आणि तिथें मुजराही कर शहाला नमूनी ’
काय शहा या देशींचा असे सांग राया ?
काय असे धर्मीचा तरि आमुच्या वदे या ?
यवन चोर मुरटे आले, आणि धनी झाले,
द्वेष कराया तूं याचा न का शिकवियेलें ?
अशा गुणें पुनरपि उभयावरिहि गैरमर्जी—
होइलची ताताची, मज दिसत असे आजीं !
काय करूं पण, ये बघता यवन चीड त्याची,
काय म्हणुनि छळणुक करितो हिंदुबांधवांची ?
चीड नसे व्यक्तीची मज, परि कृतीची त्या,
काय म्हणुनि गोमाताच्या करिति रोज हत्या ?
धर्म असे याचा याना प्यार, नी अम्हांला—
काय नसे अमुचा प्यार ? करिति का छळाला ?
वर्तु देति धर्मापरि निज नच प्रजेला जे,
फार काळ टिकले इतिहासीं न असे राजे !
तात तरी नौकरि करिती सांग अशाची का ?
काय असे कमती त्यांना लोकिं मान पैका ?
ब्रह्मकर्म न करूं देती, छळिति हिंदनारी,

अशाचा न का तो यावा राग मनी भारी ?
शिरुनि मंदिरीं देवांच्या मूर्ति भंगिताती,
जिरविण्यास राग ऐशांची का न वळे मुष्टी ?
म्हणुनि आइ ! दरबाराला जात न मी कांहीं,
जरी बळें नेलें तरि शिर लववीणार नाहीं !"
पोटिं धरुनि कुरवाळूनी माय जिजा बोले,
" धन्य, धन्य ! शिवबा, या तव वचें धन्य झालें !
होवो इतराजी 'त्याची' कवण करी स्वर्था,
राष्ट्रहितासाठीं पाणी सोडियलें स्वार्थी ! "
धन्य जिजा माता लोकीं, धन्य सुत शिवाजी !
आत्महिताचा जे करिती होम राष्ट्रकाजीं !
स्त्रिया जिजाईसम झाल्या म्हणुनि हिंदराष्ट्र
चिरंजीव होउनि गाजे जगीं महाराष्ट्र !

---

## मुत्सद्दी तारा राणी. ( चाल—उद्धवा. )

मुत्सद्दी तारा राणी । स्वातंत्र्यदेवता चपला
" बघुनीया शाहू भूप । हुरळूनी तुम्ही गेला,
गनिमांचा कावा तुम्हां । कोठूनी तो कळण्याला ?
परक्यांच्या नामें सजला । तो तुमचा राजा ठरला !
परवस्त्रभूषणीं नटला
परहस्तक पुरता बनला
परतंत्र तुम्हा करण्याला
आपुल्यासवें, जो आला । तुम्हि भजतां भावें त्याला !
सुखविलासिं केवळ ज्याचें । आयुष्य बहुतची गेलें
ऐशाचें कधिं का राज्य । तत्प्रजेस सुखकर झालें
घ्यावया ग्रास राज्याचा । चहुंकडुनी शत्रू टपले
स्थिति तुम्हा दिसत असूनी
आहे तो नृपति त्यजुनी

ज्याची सुखकर अमदानी
होय आजवरि तुम्हाला । मिळतां तुम्हि पर-भूपाला
मज खेद न वाटे कांहीं । मातें तुम्हि त्यजितां म्हणुनी
शिवरायाच्या या राज्या । दास्यता येत परि जाणीं
शाहू जरि शिवरायाचा । मम शिवाजीहि हा त्याचा
पण स्वतंत्र मम शिवजी हा
हो पराकितच शाहू हा
पर—पंजरस्थ रावा हा
मारील भरारी कितिशी । स्वातंत्र्य कोठलें त्याला !
वाड्याचा प्रश्नच नाहीं । प्रश्न असे हा देशाचा
राजाचा प्रश्नच नाहीं । प्रश्न असे स्वातंत्र्याचा
मदतीचा प्रश्नच नाहीं । प्रश्न असे हा शपथेचा
बेइमान निज देशाला
बेइमान स्वातंत्र्याला
बेइमान निज शपथेला
व्हावयास तुम्ही सजला । धिक्कार असो तुम्हांला !
बुद्धिभेद करुनि दुजाचा । आपुलें राज्य वाढविणें
आप्तांत कलह उपजवुनी । निष्कंटक सत्ता करणें
परराजाची ही नीति । तुम्हांस कोठुनी कळणें
अजि फितूर तुम्ही झालां
आपुल्या घरीं चोराला
शिरकाव करूं देण्याला
जा; आणि कोण आहां जे । मिळणार जाउनी त्याला !
समजा पण चित्तीं पक्कें । हा मराठशाहिस धोका
कायमची नच टिकणार । ही सत्ता न धरा शंका
जर चाड असे तुम्हाला । शिवशाहीची या लव का
अभिमानी शिवशाहीचे
अभिमानी स्वातंत्र्याचे

अभिमानी निज शपथेचे
या, स्थापूं जाउनि राज्य । अजि स्वतंत्र करवीराला !”
प्रोत्साहक भाषण करुनी । उरलेली घेउनि फौज
करवीरीं येऊनीया । स्थापिलें मराठा-राज्य
तेंच मुदें गर्जत आहे । शिवशाही म्हणुनी आज
सातारा अमुचा गेला
सत्य बोल तीचा ठरला
करवीर परी आम्हांला
शिवशाही अभिमानाला । ‘ उदयोस्तु ’ स्वातंत्र्याला !

---

**प्राणेश्वर नच ते माझे !** (चाल—उद्धवा०)

“ शत्रूस दाविती पाठ । प्राणेश्वर नच ते माझे !
तोतया कोण तूं येसी । सांगत रे नाव पतीचें ?
यशवंतसिंह रणसिंह । अपयश त्या येणें कैचें !
कर सत्वर काळें इथुनी । मुख तें तव नामर्दाचें !
‘ रणिं मरेन वा मारीन,’
बाणा हा हृदयिं धरून,
रजपूत जाइ चालून
शत्रूवरि, डंका गाजे । प्राणेश्वर नच ते माझे ! ”
“ वीरमती, उघडीं द्वार । मी तुझाच तो यशवंत !
एकताच ज्याचें नांव । रिपुरमणी होत सचिंत !
काळासहि भीक न घाली । जो रणांगणांत कृतांत !
दैव परी दुष्मन दावा
साधुनि, करि पाठपुरावा,
ही हार तयें ये जीवा
पशु ते दैवापुढतीं । ठरती ‘ मी मी ’ म्हणती जे ! ”
“ दैवाचें गावें गाणें । भैंदानें, नामर्दानें !

' नर बनतो नारायण तो । वदति थोर ' निज करणीनें ' !
' मनुज खरा दैवनियंता ' । कवि म्हणती एकमुखानें !
पूर्वजीं सिद्ध हें केलें,
निज कृतिनें जग दिपवीलें
त्या यशा कालिमा उठले
लावाया, वंशज त्याचे । प्राणेश्वर नच ते माझे ! "
" शत्रूस दावुनी पाठ । प्राणेश्वरि ! आलों नाहीं !
रिपुसवें झुंजणें ज्याचा । परिपाठ सदाचा, पाहीं !
रण म्हणजे ज्याची क्रीडा । तो रणास भीत न कांहीं !
रणकंदन भ्या माजविलें,
जेरीस अरीला आणिलें
तों उठे हूल का न कळे,
मम सैनिक मागें फिरले । विफल यत्न थोपविण्या जे ! "
" लाघवी अशा शब्दानीं । मी नव्हें अशी फसणारी !
ओवाळी विजयी वीरा । आनंदें रजपुत नारी !
पाहे न मुखहि त्याचें जो । विजयाविण ये माघारी !
प्राणनाथ प्रिय जरि माझे,
अरि जिंकुनि या असि-तेजें,
स्वागतार्थ मग मी शोभें
' यशवतसिंह—सम्राज्ञी ' । शब्दहि नच तोंवरि साजे ! "
" तुज होइल पश्चात्ताप । वीरमती, मनिं धर उमज !
पळपुटा, भ्याड मी नाहीं । कुमकेस्तव परतें समज !
तरि सत्वर उघडीं द्वार । घेउ दे सर्व सैन्य मज ! "
" बोलूच नका हो आधीं,
चालते व्हा वघूं जलदीं,
मिळणें न एकजण अगदीं,
जातां कीं करु जोहार ? । मेले पति म्हणुनी माझे ! "
फुंकताच वरची राख । अग्नि तो पुन्हा चेतवला,

पागलें सैन्य जमवूनी । शत्रूवर तुटुनी मेऊंलो,
आणि फळी फोडुनी त्याची । यशवत यशस्वी झाला;
हर्षभरें घरतुनि आला,
नगरात महोत्सव केला,
जयघोष अबरीं उठला,
'शत्रूस दाविती घाठ । प्राणेश्वर नच ते माझे!'

— वासुदेव-सुत कारेकर.

---

## दाई न, खरी तूं आई! (चाल—उद्धवा.)

धन्य धन्य पन्नामाई । दाई न, खरी तू आई! ॥
बेहोश बघुनि रायाला । साधिला डाव दुष्टानें
बनबीर दासिसुत कपटी । राया वधि निज शस्त्रानें
गादीला वारस न उरो । या राजवशछेदानें
म्हणुनियां राजपुत्राला,
उदयसिंग भावि नृपाला
शोधाया खल तो आला,
तों तुझी खरी चतुराई! । दाई न, खरी तू आई!
विश्वासु जनासह सौख्यें । धाडिसि त्या हद्दीपार
ठेविलास त्याच्या जागीं । तू स्वयें पोटचा पोर
तुज झालें काय असेल । धाडस हें करिता घोर
खल येउन दरडावून,
'तो कुठें कारटा?' म्हणुन
पुसता, निजसुत दावून,
वाचविसी राया भावी । दाई न, खरी तूं आई!
शेवटचें न्हाऊलेऊं । घातलेंस का त्या माई?
शेवटचें खाऊंजेवूं । घातलेंस का त्या काहीं?
शेवटचे त्याचे बोल । ऐकिलेस का मृदु काहीं?

अवसर हें करण्या कुठला,
रिपु आकस्मिक तो उठला,
अश्रुपूर नयनिंच तटला,
धैराची खरि तू बाई ! । दाई न, खरी तू आई !
आईचें कोमल हृदय । बोलतसे सगळी जनता
फत्तराहुनिहि फत्तरसें । का केलें मग तें आता ?
का नव्हती वत्साविषयीं । तव हार्दी मायाममता ?
पोटचा एक परि जीव,
वांचवूं शके नृप-जीव,
लाखाची करि जो कींव,
आणिसि हें ध्यानीं माई । दाई न, खरी तूं आई !
संबंध तुझ्या बाळाचा । नात्याचा नी रक्ताचा
संबंध राजपुत्राचा । दुग्धाचा, नच नात्याचा
तूं चतुर जोडिसी तोच । राजाचा नी देशाचा
म्हणुनियांच राजासाठीं
म्हणुनियाच देशासाठीं,
धरिसि राजपुत्रा पोटीं,
पोटिंच्यास करुनी दुरही । दाई न, खरी तू आई !
हें उदात्त तव चारित्र्य । दुमदुमेल अवनीवरती
जो जो कवि हें ऐकेल । येइल त्या कवनीं स्फूर्ति
आयकेल जी जी आई । वाञ्छिल तुजसम व्हावें ती
निज बाळा देइल पाठ,
बाळहि ते बांधितिल गांठ
मृत्यूशिं, स्मरुनी नीट,
तो पुत्र, तशि तू आई । दाई न, खरी तू आई !

—सौ. राधातनया.

म. ग्रं. सं.

# पितृस्मृतीस

(शार्दूलविक्रीडित.)

झाले द्वादश, आणखी कितितरी जातीलही अब्द ते,
जाते मूर्ति तथापि कीर्ति कधिंही लोकात ना लोपते ;
तो कष्टाळुपणा, परार्थपरता, निर्लोभता बाणली
जेथें दृष्टि पडे तिथें तव दिसे मूर्ति स्वयें ठाकली !

नाहीं त्वत्प्रतिमा जरी जवळि हें न्यूनत्व भासे मला,
आहे हृत्पटिं ठेविली तव छबी रेखूनि मी प्रेमला !
अज्ञातात तुझ्यासमान निघुनी जाणार कालें जरी
काव्यें या तुजला करीं अमर मी, मातेहि या भूवरी !

---

## काय वाहूं ?

( चाल—जरी कुणा० ॥ )

काय वाहु तूतें ? देवा ! असे मी भिकारी,
जवळि नसे धन वा कांहीं, देहही विकारी
चित्त तरी सोज्ज्वळ म्हणु मी तुजसि वहायाला !
दूषित परि भवसर्गे हो तेंहि प्राप्त काला !

वासुदेवसुत कोरकर.

ग्रंथालय ... क्र. 8430



राग—हमीर. ] **श्रीजगदंबास्तव.** [ ताल—त्रिताल.

श्रीजगदंबे, देवी, माते!
पाव, ठाव दे पदिं दासातें! ॥ धृ० ॥
कोल्हासुरमर्दिनी, दयाळे,
करविरवासिनि, भक्तवत्सले,
जगदुद्धारिणि, करुणावंते! ॥ पाव० ॥ १ ॥
अतर्क्य महिमा तुझा अंबिके,
हरिहरब्रह्मा तुझीं बाळकें,
सूत्र हालविसि कटाक्षपातें! ॥ पाव० ॥ २ ॥

---

## श्रीरामकृष्ण—छंद.

( चाल—दीननदुखहरन० )

' रामकृष्ण, रामकृष्ण ' छंद हा मना घे
' रामकृष्ण ' तारि भवीं, चरणिं झणीं लागे! ॥ धृ० ॥
बघुनि होत धर्महानि । धाव घेइ जो निदानिं
ज्ञानदीप पाजळूनि । स्थापि धर्म वेगें! ॥ रा० ॥ १ ॥
दुष्टांसी सुष्ट करी । नास्तिकासि आस्तिक करि
दीनांचि तार हरी । कलिकल्मष भंगे! ॥ रा० ॥ २ ॥
भवसागर दुस्तरतर । मायामद—नक्र फार
तारक गुरुनामसार । उमज धरिं विरागें! ॥ रा० ॥ ३ ॥
सौख्यशांति लाभत चिर । साधति पुरुषार्थ चार
आत्मरूपिं तन्मय नर । होइ साधुसंगें ॥ रा० ॥ ४ ॥

वासुदेव—सुत कारेकर.

"वासुदेवसुत" कारेकरविरचित

# मराठी शतोपदेश.

## आर्या

ब्रह्मा, विष्णु, महेश्वर या देवांमाजि थोर महिम्यानें
विष्णु असे, भृगु ठरवी; **भजणें सर्वोत्तमास नेमानें!** १

रुक्मांगदें स्वखड्गें वधिला निजपुत्र मोहिनीवचनें,
पाळियलें निज वचना; **संकटींही सत्यधर्म न त्यजणें!** २

हितवक्त्या अनुजाला लंकापति घालवून दे दूर,
झाला नाश तयाचा; **स्वजनांशीं कधिं धरू नये वैर!** ३

बलराज्यतेजहर्त्या सुयोधनालागिं रोधण्या शक्त,
पांडव तरि वन सेविति, **सुसंधिची वाट पाहणें युक्त!** ४

स्यमंतकाच्या आळें कृष्णें जिंकून जांबुवतातें
सत्राजिता मणि दिला, **भीत असावें जनापवादातें!** ५

इंद्रपदस्थित नहुषें कोपविता मुनिजनास तो सर्प
होउनि भूवरि पडला; **ऐश्वर्याचा अनर्थकर दर्प!** ६

दशरथसुतभार्येला पळवुनि दशमुख वनातुनी नेई,
बंधन जडें समुद्रा; **दुर्जनसहवास ताप बहु देई!** ७

देवकिवधास उद्यत कंसाला गोड गोड बोलानें
वसुदेवें शांतविलें; **होतो वश मूर्ख अल्प सामानें!** ८

बोले कुबेर बंधो, **उच्छृंखलपण करूं नये थोरा!**
रावण करि त्या कैदी, **भ्रष्टमतीतें रुचे न बोध खरा!** ९

विश्वसुनी मधुवचनीं दशरथ दे कैकयीस दोन वर,
आलें मरण तयीं त्या, **स्त्रीजनिं विश्वास होय घातकर!** १०

गर्वें रावण येता युद्धातें कार्तवीर्य सहज तया
बांधी क्रीडामृगसम, **जावें प्रबलासवें न झुंजाया!** ११

जरि जळवुनि तनु, शेंपुट पेटवुनी राक्षसीं दिला मार
मारुति लंका जाळी; **संकटसमयीं त्यजूं नये धीर!** १२

द्यूतीं बलरामातें कपटें हरवून रुक्मि चिडवीत,
तत्काल ठार झाला, हरलेल्या चिडविणें नसे उचित! १३

कपटप्रवीण शकुनि—प्रभृतींशीं द्यूत खेळता धर्मा
लागे राज्य मुकावें, खेळ शठांच्या सवें न ये कामा! १४

यज्ञा रक्षायास्तव विश्वामित्रास दशरथें दिधलें
निज सुत निःशङ्कमनें; द्यावें राष्ट्रार्थ दान मागितलें! १५

विदुर कथी धृतराष्ट्रा, आप्तांशीं वैर फार हानिकर!
न रुचे, विनाश पावे, होय सदा मित्रवचन सौख्यकर! १६

यज्ञसमयिं शिशुपालें निंदियलें श्रेष्ठ पूज्य कृष्णास,
तत्काल शिर उडालें सज्जननिंदा निदान घातास! १७

गाय दिली एकाची दुसऱ्या विप्रा चुकूनि नृगरायें,
झाला तत्क्षणिं सरडा; प्रदत्त वित्तास हात लावु नये! १८

पत्नीतें मुकलेला समदुःखी रामचंद्र समजून
सुग्रीव सख्य जोडी, मित्र करावा समान पाहून! १९

विराटनगरीमाजी वेतन घेऊन नर्तना शिकवी
अर्जुन वीर असूनी; कर्मदशा कोण हो! कसा चुकवी! २०

पूर्ण विचारानंतर पुत्रासहिता शकुंतला भार्या
दुष्यंत स्वीकारी; अविचार करूं नये कदा कार्या! २१

ताताज्ञा मानुनियां माय वधी परशुराम वीर पहा,
होई निर्दोष पुन्हां; गुरुजनवच पाळण्यांत पुण्य महा! २२

मारुति शभर योजन समुद्र लंघून जाय लंकेतें,
वीराग्रणी म्हणुनि हो, साहस साधक सुकीर्तिलाभातें! २३

जिंकिन शिवास म्हणुनी देवप्रेरित पुढें मदन जों ये
तों हो क्षणात भस्मचि; दुर्घट कर्मीं प्रवृत्त होउं नये! २४

यमुनाजलवासी त्या दुष्ट महा कालियास यदुराय
करि जर्जर तुडवुनियां, दुष्टाची करूं नये कदापि गय! २५

सजीव असुरकवधा इंद्रें वक्षःस्थळीं दयेंकरुन
अशनार्थ वदन दिधलें; देउं नये लीन शत्रुतें मरण ! २६

गगनपथें सुग्रीवा रावणसंदेश पोंचवायास
'शुक' येता कपि ताडिति, दुर्जनदूतत्व देइ धोक्यास ! २७

अश्वत्थामा मेला, द्व्यर्थी वाणी वदे युधिष्ठिर तो,
पोळे पश्चात्तापें; पापा अनुताप शुद्धिकर ठरतो ! २८

घेउनि सुतवय उसनें भोगी बहु तो ययाति विषयातें,
तृप्त न तथापि झाला, तृप्ति न कधिं विषयसेवनीं होते ! २९

इंद्रपदा बलि भोगी, होता तें विभव नष्ट परि सारें
हो पाशबद्ध सुतलीं, सुखोपभोग क्षणिक टिकणारे ! ३०

शत सुत मृत झाले तैं शोक करी फार अंबिकातनय
नयन सजल करि कृष्णहि; दुःखित पाहूनि कळवळो हृदय ! ३१

निःक्षत्रिय ना केली पृथ्वी तों क्षुब्ध रेणुकातनयें
किमपि न सोडियलें रण, स्वीकृत कार्या मधेंचि सोडुं नये ! ३२

विदेहभूपतिकन्या, सीता कांताहि रघुवरप्रभुची
राक्षसिणी तिज ताडिति; विचित्र गति हो ! खरीच दैवाची ! ३३

द्रोणाचार्य द्विजवर महा तपस्वी, श्रुतिज्ञ असुनीही
होइ धनार्थ धनुर्धर; संग्रहणें धर्म त्यापरी धनही ! ३४

शंभुशिरीं पूज्य जसा चंद्र जरी एकची कले युक्त
षोडशकलीहि न तसा; श्रेष्ठाश्रय एक योग्य मानार्थ ! ३५

शरशय्यास्थित भीष्में कथिलेला धर्म परिसुनी धर्म
दुःसह शोका आवरि, वृद्धकथित मार्ग देतसे शर्म ! ३६

पांडव घटोत्कचावरि कर्णकरें शक्रशक्ति सोडवुनी
निज जीवित वाचविती; सर्वपरीं रक्षिणें स्वपक्ष जनीं ! ३७

दीन सुदामा पोहे एक पसाभरचि देउनी मिळवी
कनकपुरी हरिपासुनि; धांव सुमित्राकडे विपदिं घ्यावी ! ३८

नग्न प्रमदा पुढतीं येता रक्षावयास बाणातें
कृष्ण समराविन्मुख हो ; **पाहुं नये वसनहीन ललनांतें !** ३९

बंधूस जीववाया औषधितें राम मारुती धाडी,
तीहि दुरुनि तो आणी ; **दुष्कर कार्यास योग्य नर निवडीं !** ४०

मिळवी कपटें शठ वृक आराधुनि शंकरास घोर वर,
गौरीस पळवु पाही , **विनयीं दुर्जन करा सदा दूर !** ४१

जेव्हां दुष्ट दशानन होता राज्या करीत लंकेस
मुकले सर्वस्वा जन ; **अधमनृपतिराज्यिं करुं नये वास !** ४२

निर्दोष अंबरीषा शापी कोपी महर्षि दुर्वास,
पाठिं सुदर्शन लागे ; **भलत्या ठायीं करीं न कोपास !** ४३

यज्ञीं स्वाहाकरिला तक्षक रक्षावयास असमर्थ,
त्यागी न इंद्र त्यापरि ; **त्यागुं नये आश्रयार्थ जो येत !** ४४

खल कंसें भगिनीचे पुत्र सहा वधुनि उपजताक्षणिंच
केला स्वनाश जवळी , **कोणींही कधिं करु नये नीच !** ४५

सीतात्यागानंतर मुनिजनसह तो मुनिव्रती राम
राही निज नगरींतचि , **न्यावा सत्संगिं काल हा नियम** ४६

कृष्णार्जुनभीमातें क्षत्रियचिन्हीं जरातनय जाणे
जरि विप्रवेषधर ते , **ओळखणें मनुज चालचर्येनें !** ४७

हिरण्यकशिपु दुरात्मा स्वैरपणें ज्या दिशेस विहरतसे
सुर दुरुनी तिज नमिती , **दुष्टा दुरुनीच नमन योग्य असे !** ४८

मुनिशप्त परिक्षित नृप अमित करी यत्न जीव वाचाया,
तरि सर्पदंश होई ; **मृत्यु न येई कुणाहि टाळाया !** ४९

सत्यापरि जग भासे, केवळ मिथ्या परंतु समजून
मुक्ति मिळविली जनकें ; **मिथ्या स्वप्नापरी जगा मान !** ५०

रात्रंदिन रमणींशी रमणाऱ्या अग्निवर्ण राजातें
अंतीं क्षयरोग जडे ; **माना विषसमचि विषयभोगांतें !** ५१

ब्राह्मण, शूद्रस्त्रीपति, हिंसक परि शरण नारदा जातां
वाल्मीकि होइ मुनिवर; **अभ्युदया ठेविं सुजनपदिं माथा !** ५२

बघुनि एकटी कृष्णा धरि कीचक कामवासना स्वैर,
म्हणुनी भीम तया वधि; **हो परदाराभिलाष नाशकर !** ५३

चक्रव्यूहा भेदुनि जातां, अभिमन्यु एकटा बघुनी
वधिती कौरव मिळुनी; **जाउं नये एकटेंच शत्रुजनीं !** ५४

पुष्कर राज्या जिंकी, तैं ऋतुपर्णाकडेस नळराय
सारथि होउनि राही, **कुदशेमाधिं गुप्त राहणें योग्य !** ५५

स्वक्षात्रधर्म चिंतुनि मानार्हां गुरुजनांसवें समरीं
विजयी अर्जुन लढला; **पाळावा घोरही स्वधर्म जरी !** ५६

जलधिमंथनानंतर अमरांतें वांटिली सुधा देवें
असुरां सुरा तशी ती, **योग्य जया जें तयास तें द्यावें !** ५७

एकत्र जमुनि यादव पिउनि सुरा मरति मत्त होऊनी
वधुनी परस्परांना, **कदापि मद्या शिवू नये कोणीं !** ५८

जातां निमंत्रणाविण ताताच्या यज्ञिं होइ अपमान,
म्हणुनि सती जाळुनि घे, **कुठें न जावें निमंत्रणावीण !** ५९

अवध्य यादवकरवीं कालयवन, म्हणुनि कृष्ण कपटानें
वधि मुचुकुंदाकडुनी, **ठकवुनिही उचित शत्रुला वधणें !** ६०

कृष्ण जरासंधातें जिंकी बहुवार रणिं, तरी भिउनी
बांधुनि जळिं दुर्ग वसे; **जित अरिशीं फार वागणें जपुनी !** ६१

यज्ञाश्व शोधतांना कोपविती कपिलमुनिस सगरसुत,
तैं नाश सर्व पावति, **शांत महात्मा करूं नये क्षुभित !** ६२

गाधिज मुनिवर असुनी लंपट होऊन मेनकेमागें
कुत्रा बनूनि जाई; **अजिंक्य मदना सदा भिउनि वागे !** ६३

गर्वोन्मत्त दशानन लेखी तृणवत् त्रिलोकवीरांतें,
रणिं वानर जिंकिति त्या, **थारा द्यावा बुधें न गर्वातें !** ६४

मातृवाक्शरीं पीडित बाल ध्रुव आचरूनि तप उग्र
मिळवी उच्चपदातें; **उद्यम हा उन्नतीस पथ सुकर!** ६५

कुंजवनीं हरि गोपी क्रीडति तैं ती म्हणे तया दमुन
स्कंधीं वाहुनि मज ने, **स्त्रीन्या अतिपरिचयांत अपमान!** ६६

रणिं आत्मचिह्न धरि त्या प्रजल्पणाऱ्या शृगालराजासी
पाहूनि कृष्ण हांसे; **वादविवाद न बरा लबाडांशीं!** ६७

सुग्रीवशत्रु म्हणुनी रामानें दोषरहित वालीतें
कपटें लपुनी वधिलें; **माना निजशत्रु मित्रशत्रूतें!** ६८

क्रोधें कौरवनगरी हलधर पाहे नदींत फेंकाया,
परि सांत्वविला गेला; **कुपिताचें उचित सांत्वनचि समया!** ६९

अपराधी द्रुपदाला पार्थकरें धरुनि आणुनी द्रोणें
सोडियलें करुणेनें; **अंगिं धरावी क्षमा मनुष्यानें!** ७०

फजित सुयोधन पाहुनि हसला त्या मयसभेंत भीम तदा,
कारण तेंचि कुरुरणा, **बळें न उभवा स्वतांच वैर कदा!** ७१

भगीरथें आणियली पितरोद्धारा महीस गंगा, ती
पावन इतरांहि करी, **लोकहिता आचरीत तोचि कृती!** ७२

गुरुपत्नी तारेला चंद्र पळवि, म्हणुनि देवदेवांत
झालें युद्ध परस्पर, **स्त्री वैरा मूळबीज हो खचित!** ७३

करि अध 'पूजनीया' चिमणी त्या ब्रह्मदत्तपुत्रातें
( रायें समजविलें जरि ), **आश्रय देऊं नयेच नीचातें!** ७४

गर्वान्ध लुब्ध कौशिक वसिष्ठगो न्यावया बळें इच्छी,
परि ती तया न वश हो; **दुर्मिळ वस्तू कदापि नच वांच्छी!** ७५

बलगर्वित कर्णाचें धरुनियां अर्जुनामधें वैर
कौरव जोडिति मैत्री, **स्वरिपूचा रिपु कराच निज मित्र!** ७६

निजरिपुनाशास्तव रणिं इंद्र बनुनि कृपहि, नेइ वाहून
साह्यक पुरंजयातें, **मानावा साधकें न अवमान!** ७७

शापि अहल्यारत त्या इद्रातें प्रथम गौतम क्रुद्ध,
तरि करि सहस्रलोचन, सज्जनशापहि असेच सत्फलद! ७८

लंकापति सज्ज रणा पाहुनि पुष्पक विमान अर्पून
रक्षी कुबेर 'अलका'; रक्षावें बहुत अल्प देऊन! ७९

सौभद्र वीर, विनयी सपुत्र पडला तथापि अर्जुन तो
राही लढतचि समरीं; गेल्याचा शोक सुज्ञ नच करितो! ८०

व्यासमुखें परिसुनियां जनमेजय पुढिल वृत्त निज घोर
राही सचिंत नित्यचि, चिंता पुढची करूं नये थोर! ८१

कर्ण तनय कुंतीचा, सूर्यकुमारहि, परंतु परसेवें
राधेय जाय गणिला, सुज्ञें न स्वकुलशील सोडावें! ८२

अर्थज्ञ, सुरर्षि नारद भामेला—त्यजुनि इतर हरिरमणी—
स्वर्गीय पुष्प देई; एक प्रभुचीच योग्य मनधरणी! ८३

स्त्रिया रोहिणीविण त्या त्यजि सर्वहि म्हणुनि दक्षशापानें
झाला क्षयी शशी हा; बहुपत्नीकें न एकरत असणें! ८४

पापक्षय झाला तरि यम दंडी हें बघूनि माडव्य
शापुनि शूद्र तया करि, जन निर्दोषी न शासणें योग्य! ८५

शतधन्वा निशिसमयीं सत्राजित गाढ सुप्त पाहून
स्यमंतकास्तव वधि त्या; अतिझोंपाळू निशीं असावें न! ८६

विश्वामित्रें वधिले शतही सुत तरि समर्थ विधितनय
प्रतिकारी न तयातें; बाणावें शील आत्मकुलयोग्य! ८७

कच सुरपक्षीय जरी दैत्यगुरूपासुनी सुविनयानें
संजीवनी शिकुनि घे, विनयें निजकार्य साधुनी घेणें! ८८

द्रुपद वदे द्रोणातें, रथी पदाती समान नच होती!
गणसि कसा मित्र नृपा? मानावा न स्वमित्र कुणि नृपति! ८९

कंसवधानंतर हरि. ययातिशापा हरावया शक्त,
तरिही न राजपद घे, पूर्वकुलाचार राखणें युक्त! ९०

विकल गदे द्युमतीच्या येता प्रद्युम्न समर सोडून
धिक्कारी कृष्ण तया; परतुं नये रिपुस पाठ दावून ! ९१

एकाग्रता स्वकर्मी शरकाराची बघून दत्तानें
आत्मज्ञान मिळविलें, क्षुद्रापासूनही सुगुण घेणें ! ९२

कृष्णातें ठकवाया विधि लपवी गोपधेनुवत्सें तीं,
परि हो स्वतांचि वंचित, नरम पडे ठक महाठकापुढतीं ! ९३

प्रसेन सेनेविरहित मृगयारत विहरता अरण्यात
मारी सिंह तयातें, विहरुं नये एकलेंच विपिनांत ! ९४

शिवलिंगान्त न लागे, कामधेनु परि म्हणे विधी लावी,
म्हणुनी दु:शाप मिळे खोटी साक्ष न कदा कुणीं द्यावी ! ९५

रणिं पुत्र बभ्रुवाहन करी पराजितहि पार्थ तरि साची
संतोषे, नच लाजे; तनयकरें सुज्ञ अपजया वाञ्छो ! ९६

कुरुसंग्रामानंतर होउनि कष्टी कृपाळु कृष्णातें
सांगे स्वदु:ख कुंती; सांगावें दु:खगूज सुहृदातें ! ९७

दु:शासननक्रानीं त्रस्त अशा द्रौपदीगजेंद्राना
सोडवि हरि तत्कालचि; विपदिं रिघावेंच शरण हरिचरणां ! ९८

दैवें वनिं लाधे त्या शुक्रसुतेला ययातिराजानें
वरिलें निःशंकपणें; दैवाचा सहज लाभ न त्यजणें ! ९९

प्रल्हाद असुर असुनहि गर्भी ऐकून नारद सुबोध
तत्त्वज्ञ हो श्रेष्ठचि; ऐकावा नेहमींच हितबोध ! १००

शत आर्यांनीं केले स्पष्टचि देऊन विविध दृष्टांत
ते हे शत बोध सुरस, वर्ते यापरि तदीय हो सुहित ! १०१

ज्ञात्यांना रमवाया मूढजनीं व्हावयाहि उपकार
संस्कृति गुमानि कवि रचि शतोपदेशप्रबंध सुखसार ! १०२

अठराशें लपन्नीं शकिं विरची तोच, 'वासुदेवसुत'
सुगम 'समार्यां' माजी, ठसवा हे नीतिबोध हृदयात ! १०३

ॐ शांतिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु ! ! !

**मीलन** ( चाल–राजहंस )

जीवाचे राजे आले
नटला कीं राजस जीव
चांदोबा हाता आला
सौख्याला नाहीं ठाव
अस्फुटसे कांहीं घुमले
लज्जेला येई पूर
मृदु कोमल स्पर्श जहाला
रोमांचित होइ शरीर
हृदयाला हृदय मिळोनी
एक जीव दोघे झाले
स्वानंदे मग ती हर्षे
मीलनात हास्य विराले !

---

**आणि मग—** ( वृत्त– शार्दूलविक्रीडित )

—हातें लोटुनिया मला, पदर ता घाली मुखीं सत्वरा
अंगीं रोम उभारता थरकुनी लाजूनि गेली पुरी
ऐकाया मधु "इश्श काय असले !" कीं हो मला लावुन
दृष्टी रोखुनि एकदा मजकडे गेली जवें तेथुन.

—**अनंत ओगले.**

---

**बोधमाला** ( वृत्त–उपजाति )

लहान मोठे बघ एकदृष्टी । करी न लोभें कधिं नीच गोष्टी
रहा सुखानें असल्या स्थितींत । हा बोध ऐका वदतो अनंत
असार संसार असे समस्त । मोहें भुलूनी नर होय मस्त
स्त्रीपुत्रमित्रादिक हे कुणाचे । स्नेहें म्हणोनी मम मूढ नाचे
कीं एक दोष दडतो गुणसंचयांत । जैसा कलंक लपतो विधुच्या करांत
नेणों कवींद्रमति हो च्युत येथ कैशी । दारिद्र्यदोष गुणकोटिस शीघ्र नाशी

—**मु. शं. देशपांडे.**

**गोड स्मृति** (गज्झल– स्वनित. )

जादूगिरी नयनातली तव, गुंगवी मन भारुनी
क्षण भासलें मज त्या क्षणीं चमके नभीं सौदामिनी.
तिर्यक् सखे, तव पाहणें, हसणेंहि अन् गालांमधीं,
वदुनी जरा थोडें कुठें, मधु लाजणें वरचेवरी,
हो नेत्र–मीलन आपुलें सहजींच, तों भावावुनी
गेलीस तू क्षण मोहने, लाली कपोलीं दाटुनी.
जे राहिले चपलेक्षणे, ह्यदिं भाव अस्फुट सांठनी
ना शक्त तू करण्यास गे जरि व्यक्त ते, तव भाषणीं,
होशी कशा कष्टी वृथा ? ते वाचिले तव लोचनीं !
सौख्यातले क्षण, अल्पसा सहवास दे तव येथला.
गेले निघोनी हा ! क्षणीं तिमिरार्णवीं जन पातला
विद्युल्लता चमकोनि की अधार हा ! जगिं दाटला !!

* * *

स्मृति गोड जी परि राहिली हृदयांतरीं मम व्यापुनी,
मी कठितों दिन ज्यामुळें, आधार तो मज जीवनीं !

---

**उपवधूचें करुण कहाणी** ( गज्झल )

‘ कान्ते ’ ह्मणोनि कोणी। दयितेस हांक मारी
येताच हाक कानीं। मज होय दुःख भारी
नोहेच हांक ती हो। वाटे सुरी दुधारी––
खुपसून हाय ! कोणी। हृदयास या विदारी.
‘ कान्ते ’ कुणा ह्मणू मी ? काता घरीं न दारीं
वैगुण्य हें सुखाचें। जाचे मनास भारी
त्रैलोक्यनाथ विष्णु। लक्ष्मीविना भिकारी !
तांबूल वल्लभातें। पत्नी हळूच देई
चोरून ‘ साखरेचा ’। तोही हसून घेई

दृश्यें अशीं सभोंतीं । येतीं दिसून पाहीं
पाहून अतरात्मा । व्याकूळ हाय ! होई
हें लास्य भामिनीचें । नशिबीं अजून नाहीं
दुर्भाग्य याविना तें । जगतांत काय राही !
सायन्तनीं गृहाला । येता दिसेल खोटी—
दारांत राहिलेली । मन्मार्गदत्तदृष्टी
' खोटी घडे कितीही । येतात प्राण कंठीं '
लटक्या वदेल रागें । दाबून हास्य ओठीं
कोणी ' तिच्या ' विना या । सांगा करील गोष्टी ?
तिचियाविना न कोणी । लाजून गोड थोडी
सांगेल सोडवाया । मातें ' गुलाबि कोडीं '
संबोधनात ' कांते ' । जी सर्वकाल राही
सांठून गोड जादू । अन्या कशात नाहीं.
' कांते ' तुझ्याच ठायी । साम्राज्य मत्सुखाचें
सौभाग्य सत्सतीचें । लावण्य अप्सरेचें
माधुर्य गाढ ओठीं । स्वर्गीय त्या सुधेचें
नेत्रांत ये दिसोनी । चाञ्चल्य त्या विजेचें
सहवास लाजवीतो । त्या शांत चंद्रिकेतें
गुम्फून रोज बसतों । मी काव्यपुष्पमाला
कांते तुझ्याविना ती । वाहू बरें कुणाला ?
चानोत वा न जन ती । पर्वा नसे मनाला
परि जीव या जनाचा । तव कौतुका भुकेला
येशील तू घराला । धांवून केधवा गे
दवडू नको क्षणाला । ये ये निघून वेगें
घोंटाळुनी तुझ्या गे— । मार्गांत जीव भागे
कर्तव्य कामिनीचें । करण्यास येइ वेगें
राज्ञीच तू गृहाची । बदा तुझा सदा गे
साम्राज्य गाजवाया । ये ये, परन्तु वेगें.

—रा. आ. भिसे.

## हृद्‌गूढ

(वृत्त—साकी)

यौवनपूरित राधा देवी कटिं घट घेउनि आली
हांसत ठुमकत चाले, विलसे सालसता मुखकमलीं
यमुनेचा तो घाट खरोखर प्रेमाचा मधु ठेवा
घागर भरतां भरतां भरला कानीं मंजुळ पावा
सूर्यास्ताचे स्वर्ण किरण ते नाचति तरुवेलिवरी
शीतल वारा प्रशांत वाहे एकतानता पसरी
त्यात हरिणि ही आज घुटमळे प्रेमसुधापानाला
अधर खरोखर फार कांपती वाञ्छिति चुंबायाला
वेत्रधारि तो देवकिनंदन पाहुन या हास्याला
राधेचें हृद्‌गूढ उकलुनी प्रेमरसांतरिं रमला

—वि. म. म्हैसे.

---

## निसर्गाची शिकवण

( वृत्त—पृथ्वी )

जरी ग्रहण, अस्त हो, तरि न भानु सोडी क्रम
प्रभातिं पथ आक्रमी, वितुळवी करानें हिम
दुपारिं तपुनी शिरीं करि पयोद तो भूज्जल
न संकटपरंपरा गणित हीन होता बल
मुळीं न दिवसा प्रकाश, तरि तेज रात्रीं दिसें
निराशभिरुता कुठें, परि न नेम त्या सोडितें
लकाकति नभीं कशा बहुत तारका मंगला
यशस्वि अबलाहि त्या सतत उद्यमें जाहल्या
जरी पतन पावती महिवरी अहा भगुनी
मनीं न हुरहूर ये, लव न शोकही त्या क्षणीं
परिस्थितिशिं झुंजती सतत, घ्यावयासी सुखा
शिलास्वरुप तारका प्रसवती पहा हीरका

सुधांशु शशिवीर तो, नच गणी कधीं संकटा
जरी भवतिं मेघ ये, परि न खिन्नतेची छटा
स्वमार्गिं जरि काहिं हो, परि न सोडि तो उद्यमा
स्वकार्य कधि ना त्यजी, धवल तेज दे चंद्रमा
खळाळुनि करीतसे उदधि सारखी गर्जना
तुषार उडवी दुरी, करित एक ही घोषणा
करा सतत उद्यमा मजपरी, न घ्या शांतिला
यशस्वि नरवीर तो सतत उद्यमीं रंगला

—अनंतराय.

---

## सूर्य व सृष्टिसती (चाल—फटक्याची)

शैलशिखर उत्तुंग तुरगीं बसला कोमल बालरवि
तिमिरसमर जिंकून अंबरीं विजयपताका फडफडवी
पूर्वक्षितिजीं दिसणारी ही ताम्बुस कांती काय असे
विजय सुमंगल गुलाल उधळी ज्यात कवींचें काव्य वसे
किंवा विजयी प्रेमपतीला ओवाळाया रम्य उषा
पंचारति घेऊन पातली म्हणुन उजळल्या दाहि दिशा
देवदानवांचें का झालें युद्ध स्वर्गीच्या रणांगणीं
लाल गोल जणु त्यातुन सुटला वेगवान हा नभोंगणीं
स्वर्गसुखाची रम्य कल्पना आणुन द्याया सृष्टीला
समतावादी आला वाटे नभपथिं रवि हा उदयाला
रविउदयासह उदय जाहला मांगल्याचा पूर्णपणें
स्वागतार्थ वाजतीं सुवाद्यें तेंच खगांचें गुणगुणणें
मुग्ध बालिका कलिका खुलल्या अरुणप्रेमा मनिं दाटे
पवनें लवतां शालिनतेनें प्रणती केल्यासम वाटे
मखमालीचे, जरतारीचे गालीचे घालून अहा
सृष्टिसतीचा दिवाणखाना फुलला अरुणा पहा पहा

प्रथम भेट दे तिला, नको रे लावु आता एक क्षण
घेई पाहुणचार तियेचा करुनि दयेची पाखरण
पाय धुवाया तिनें ठेविलें तुला कितीतरि दारिं जल
निर्झरकांठीं मुख प्रक्षाळी स्नानाला हें सिंधुजल
फलाहार घे भोजनही कर, निसर्ग हा तुजसाठिं तिनें
खुला ठेविला, त्या देवीच्या प्रेमनिर्भरीं काय उणें
तारुण्याच्या तेजें झळकत पहा सृष्टिचा ससार
बघत बघत ये तसाच खालीं, खालीं शय्याहि तयार
सृष्टिसतीच्या प्रेमसुखाची करी पूर्तता दिवाकरा
अनुरागाच्या उन्मादाचा रग तांबडा खुले पुरा
अस्तगिरीच्या अभिनव शेजीं करा मौज तुम्हि दोघेही
रजनीनें झाकिलें तुम्हाला मीही जातों मद्देहीं.

—कमलाग्रज.

---

विनंति (चाल—त्यजि भक्ता)

[ ज्येष्ठ बंधु रावण याच्या दुराग्रहामुळें आपल्या कुलाचा नाश होणार आहे, तो प्रसग टाळावा म्हणून बिभीषणानें रावणास केलेली शेवटची विनंति. ]

हें वचन आयकें माझें कर जोडुनि वदतों भाई !
शार्दूल नृपाचा असशी
तैसाचि धैर्य-बल-राशी
परि तस्करकरणि करिशी
त्यज आज निंद्या कृति ही ॥ १ ॥ हें वचन.
चौकड्या दशावर चार
पसरला राज्यविस्तार
दळ तुझें असें अनिवार
अविचार सोडुनि देई ॥ २ ॥ हें वचन.
नरवेष जरी रामाचा
आधार सकल जगताचा

सौमित्र अहीवर साचा
जनकजा जगाची आई ॥ ३ ॥ हें वचन.
अजि सोडिं दुराग्रह राया
जा शरण रघुपतिपाया
धाडुनी तयाची जाया
करिं सुखी, अभय तूं होईं ॥ ४ ॥ हें वचन.

—रामानुज.

---

पद १ लें (चाल—कोण जगिं मला हितकर)

वंदन करुं अजि भारत-भूला
ईश घेइ जिथ सगुण रुपाला ॥ धृ० ॥
धनकनकाचा मंगलनिधीचा
वाटे रमणिय भूषण महिला ॥ १ ॥
राम, कृष्ण, शुक, दत्त, दास, शिव
अवतरती भू उद्धरण्याला ॥ २ ॥
हो परवशता असह्य भारता
कसा द्रव न ये प्रभु अजि तुजला ॥ ३ ॥

पद २ रें (चाल—दे हाता या).

घे धावा श्रीगिरिजाधवा
सुख वितरत अभिनवा, रत-भवा, निशिदिनीं मानवा ॥ धृ० ॥
धर्म हा खचित बुडला
छळवाद बहु माजला
ये प्रभवर या काला
सुखमय विहरत, जगिं या सतत करिं करुणा रवा

पद ३ रें (चाल—लागे हृदयीं हुरहूर)

भावें स्मरुं या रघुवीर, मनीं। करु नमन चरणीं प्रभुवर भवहर ॥ धृ० ॥
येई सखया, नेई विलया, संकट हें भव-नद बहु दुस्तर ॥ १ ॥

पद ४ थें (चाल—लपविला लाल)

नमविला काम हरि चरण आठवुनी, स्मरुनि प्रभु मनिं रघुतिलकाला हृदिं नाम धरुनिया, प्रभुपदिं रमला ॥ ध्रु० ॥ विनवु चला आजि पवन-सुताला, सुखकर ह्याचि प्रभु तारिल सकलां ॥ १ ॥

—पं. भा. कुलकर्णी.

---

शिवप्रभूस (चाल—दत्त दिगंबर मूर्ति)

हिंद—राष्ट्र धर्मांचा नेता तूंचि शिवाजी नृपवर्या
धर्मरक्षणा अवतरलासी या भूवरती भो सदया
तुजविण कवणहि शक्त नसे बा परवशतेसी तोडाया
तेवीं दुर्जनगण निवटूनी भूभारातें उतराया
बंधुप्रेमें पालनकर्ता देउनि सकला स्वातंत्र्या
निज वर्णाश्रम धर्मपथीं या देइल मोदें विचराया
स्त्रीपुत्रातें भारतभूवरि निरखि झटती गाजाया
जन्म घेउनी पुनरपि येई स्वधर्मनिरता सुखवाया
घटोत्कचाची भुरळ घालुनी भुलविति आम्हा निष्कपट्या
देश कुणाचा कोण भोगिती अत्याचारें शिवराया
तूंच पहा कीं योग्य काय हे? अर्ज करितसें तव पाया
कृपा करोनी लवकरि यावें परपीडित हे सुधराया

—य. ल. प्रभुदेसाई.

---

मित्र प्रेमाची पराकोटी (वृत्त—आर्या)

उत्तम गृह जों आहे तोंच मुदें काय त्यांत नांदावें?
जीर्णपणा त्या येतां मोडावें वा त्यजुनि कां जावें?
जोंवरि फलपुष्पें दे तरु तोंवरि काय त्यास राखावें?
वठुनी गेल्यानंतर निज हस्तें त्यास काय कापावें?

किंवा सुमन सुवासिक आहे तों का शिरीं हृदीं घ्यावें ?
सुकतां परि काळें तें चुरडुनिया का धुळींत फेकावें ?
कीं दुग्ध धेनु देते तों तृण हिरवें तियेस चारावें !
होता जरठ अहाहा ! यवनकरी तीस काय ओपावें ?
कीं शुक मंजुल बोले तोंवरि द्यावा तयाप्रती मेवा !
वाचाविहीन बनता त्यासी उपचार का न योजावा ?
कीं 'श्री' युत नर आहे, तोंवरि मित्रत्व फार राखावें ?
निर्धन परि तो होतां, मित्रानें त्यास काय सोडावें ?
किंवा कुरूप कोकिळ, राहो; 'मधुवाणि' त्यास परि साजे
तैसा मित्र असो वा ! सद्गुणकीर्ती जनांतरीं गाजे
मित्रानें मित्राला प्रेमाचा नित्य जीव मानावा
त्यावरि संकट येतां, निजमुखिंचा घांस त्यास चारावा
जैसा अंधःकारीं समिरापासून दीप रक्षावा
तैसा सन्मित्रानें आपत्कालांत मित्र रक्षावा.

---

## सिंहाचा छावा निजला (चाल—अजि अंकुर हा)

तो बादशहा मुसलमान होण्याला, सांगे जैं संभाजीला
तों तळव्याची आग मस्तकीं गेली, अंगाची लाही झाली
तैं नसानसांतूनि रक्त हो ! उसळे, शौर्याला भरतें आलें
चढवूनी भिंवया वरतीं
नृपतीची करण्या माती
वीराचे बाहु स्फुरती
परि चार पदें जाउनि पुढतीं फिरला, सिंहाचा छावा निजला
मृगराजाला निद्रेंतुनि उठवावें, क्षुधिताचें अन्नचि घ्यावें,
कीं व्याघ्राला अंगुलिनें डिवचावें, आगींत तेल ओतावें
तो क्रुद्ध तसा झाला तैं ऐकून त्या नीचाचें तें वचन

मरणाला नाहीं भ्याला
त्वेषानें बोले बोला
'तव कन्या दे रे' मजला
तरि सोडिन मी खास हिंदुधर्माला, सिंहाचा छावा निजला
त्या यवनानें तद्वधभाषा केली, वीराला तीही रुचली
तइ यमदूतें नेउनि बाहिर त्याला, एकेक नेत्र खडियला
मग रसनेतें कैचें चरचर चिरिलें, खंड खंड तनुचे केले.
तो समय आणि ती मूर्ति
ठाकताच नयनापुढतीं
टपटपां आसवें गळतीं
अजि संभाजी कुठें वीरमणि लपला? सिंहाचा छावा निजला.

—'कृष्णसुत' (ना. कृ. भूतकर).

---

**कां हो हरी—** (वृत्त—वसंततिलका)

केली जयद्रथवधार्थ जयें प्रतिज्ञा। जी ऐकुनी परम विस्मय होइ सुज्ञां
त्या श्वेतवाहनपणासही चालवीलें। कां हो हरी मजवरी मन रुष्ट केलें ?
प्याया न दुग्ध म्हणुनी उपमन्यु बाळ। निर्वाण भक्ति करितां तव अल्पकाळ
क्षीराब्धि देउनि शिशूसहि तोषवीलें। कां हो हरी मजवरी मन रुष्ट केलें ?
मातंग अश्महृदयी, अटवी उदास। देखोनिया दचकला मनिं चंद्रहास
त्यातें नृसिंह बनुनी तइं वाचवीले। कां हो हरी मजवरी मन रुष्ट केलें ?
ऐशा तुझ्या श्रुतिकथा बहुधा अनंत। ऐकोनियां भरवसा धरुनी मनांत
गांगेय हा पदिं नमूनि विभूस बोले। कां हो हरी मजवरी मन रुष्ट केलें ?

---

**विषयपंचक** (वृत्त—मंदाक्रांता)

रानीं पाणी पिउनिहि तृणा सेवुनी शांत वागे।
वेगें जो या चपल पवना सारितो नित्य मागें

एक्या 'शब्दें' हरिण असला गोंविला नाशपाशीं
कैसे त्याचे विषय वसती पाचही त्याजपाशीं !
मोडी लीलेंकरुनि विपिनीं पादपां जो करानें
लोपे जेथें मनुजबळही आघवें विस्मयानें
एक्या 'स्पर्शे' द्विरद असला लोटिला नाशपाशीं
कैसे त्याचे विषय वसती पाचही त्याजपाशीं !
आनंदानें विहरत असे जो सदा अंबरात
पेटे चिंतानल न चुकुनी ज्याचिया अंतरात
एक्या 'रूपें' शलभ असला घातला नाशपाशीं
कैसे त्याचे विषय वसती पाचही त्याजपाशीं !
जो अब्धीच्या लहरिवरुनी खेळतो सर्वकालीं
धाता ज्याचें अशन रचितो त्या अपारीं अगाधीं
एक्या ऐसा शफरक 'रसें' रोंविला नाशपाशीं
कैसे त्याचे विषय वसती पांचही त्याजपाशीं ?
पावे नाशा नृबळ सगळें देखतां साद्र काष्ट
तें फोडीतो सहज, नलगे ज्यास हो अल्प कष्ट
एक्या 'गंधें' मधुप असला विंधिला नाशपाशीं
कैसे त्याचे विषय वसती पाचही त्याजपाशीं !

विषयपञ्चक यापरि मारक । न विषसंचय याहुनि दारक
भरि अहर्निश अंतरिं जो हरि । विषयमत्त गजासचि तो हरी !

—मु. शं. देशपांडे.

---

**निर्भयता** (... ...ची)

मन मानेल तैसें करीं । दे अथवा न दे मीठभाकरी
विषाद कसला कटु बोलांचा । तरंग असतो दुर्बलतेचा
शमविल सगळें निर्मल वाचा । हृदयीं निर्मल गंगा वारी !
सुखदुःखाचे प्रसंग येती । तीव्र निराशा कधिं अनुभविती
आशेचेही तरंग उठती । धैर्याचे नर शांत गिरीपरी

ठाण माडलें झुजायाचें । काम नव्हे तें मुळिं दुबळ्याचें
मारू अथवा मरू अशाचें । न रिघे कसलें भय हृदतरीं !
सत्यासाठीं जीवहि देई । भाव निमाले बोलहि नाहीं
युद्धाचा झुझार शिपायी । वृत्ती बनली निर्भयकारी !

—सदाराम.

---

**ममत्व तव जाणुनी—** ( चाल–पदाची )

हृदयकमल हें तुला वाहिलें । मान्य करुनि घे पहिलें वहिलें !
तूच जाणसी गंध तयाचा । तूच असति निर्माता त्याचा
मी तों वाहीं भारचि साचा । मज इतुकें रसिकत्व कोठलें !
कृपा म्हणुनि तव म्हणतो माझें । लादलेंस तू मजवरि हें जें
सागतों तयां भेटति जे जे । महत्त्व मजला कोण तुजमुळें !
अशीच राहो कृपा मजवरी । सतत, तव पदीं आस न दुसरी
नुरेल मम भाग्यास मग सरी । ममत्व तव जाणुनी विनविलें !

—वासुदेवसुत कारेकर.

---


## भारत–कवि–मंडळ, कोल्हापूर.

### विद्वानानीं वाखाणलेलीं] काव्यपुष्पें [नियतकालिकांनीं प्रशंसलेलीं

| | आ. पै. | | आ. पै. |
|---|---|---|---|
| ज्योतिर्लिंग संगीत पदें | १—० | ध्वज | २—० |
| गंगाजळी | (शिल्लक नाहीं) | बायकांसाठीं गाणीं | (शिल्लक नाहीं) |
| स्वनितांजलि | ४—० | काव्यकिशोरी | ६—० |
| प्रेमपराग | (शिल्लक नाहीं) | शतोपदेश (संस्कृत मराठी) | ४—० |
| भावसंगम | १२—० | मराठी शतोपदेश | १—६ |
| काव्यकथा | (शिल्लक नाहीं) | ऐतिहासिक पोवाडे | १—० |

एकच पुस्तक हवें असल्यास पोष्टाचीं तिकिटें पाठवावीं.
शिवाय ट. ख. १ आणा.

भारत-कवि-मंडळ, पुस्तक ७ वें.

# शतोपदेश



जगीं जगे, जगें जनहि करितों, तोच जगतो!

वासुदेवसुत कारेकर.

# 'शतोपदेश' वरील कांहीं अभिप्राय.

डॉ० कृष्णाबाई केळवकर, एल्.एम्. अँड् एस्., एल्. एम्(डब्लीन):—

श्री० कारेकर यांनीं 'गुमानि'कवीच्या आर्यांवरून मराठींत रचलेल्या समआर्या फार चांगल्या साधल्या आहेत. थोडक्यात पुष्कळ पौराणिक माहिती एकत्र ग्रथित झालेली आहे व प्रत्येक आर्येच्या शेवटीं सुभाषित घातल्यामुळें विशेष शोभा व उपयुक्तता आलेली आहे. सदरहू आर्या शाळांतील मुलांनीं पाठ करण्याजोग्या आहेत. ता. १६।१।३२.

प्रो० डी. एस्. पंगु, एम्.ए., मराठीचे प्रोफेसर, राजाराम कॉलेजः—

येथील कवि श्री. कारेकर यांनीं संस्कृत शतोपदेशाचें समवृत्त मराठी भाषांतर केलें आहे, तें मूळ ग्रंथाच्या तुलनेनें वाचून पाहिलें. लिहिण्यास आनंद वाटतो कीं, श्री० कारेकर यांचें भाषांतर मुळास धरून सुरस व सहज असें उतरलें आहे. आर्येच्या प्रथमच्या तीन चरणांत पुराणप्रसिद्ध एकेका वीराचें चरित्र थोडक्यात ग्रथित करून चवथ्या चरणांत त्या चरित्रापासून अर्थांतरन्यासरूपानें तात्पर्य सांगणें हें कवि गुमानीचें वैशिष्ट्य, श्री० कारेकर यांनींही आपल्या भाषांतरात जसेंच्या तसें कायम ठेविलें आहे. शब्दाची किंवा अर्थाची कोठेंही फारशी ओढाताण झालेली नाहीं; यामुळें श्री० कारेकराची कृति हें कशाचें तरी भाषांतर आहे असें सहसा वाटत नाहीं. मूळ गुमानीचें संस्कृत काव्य व श्री० कारेकराचें भाषांतर हीं दोन्हीं तुलनेनें दुय्यम शाळांतून अभ्यासण्यायोग्य आहेत असें मला वाटतें. श्री० कारेकर यांची कृति महाराष्ट्ररसिकांना प्रिय होईल अशी दृढ आशा आहे. ता. २३।१।३२.

श्री. ए. व्ही. देसाई, एम्. ए., हेड्मास्तर, शाहू दयानंद हायस्कूल, कोल्हापूर:——श्री. 'वासुदेवसुत' यांनीं केलेलें भाषांतर वाचलें. भाषांतर शब्दशः असलें तरी तें स्वतंत्र असल्याचा भास होतो. भाषांतराची भाषा साधी असून सुगम आहे. नीतितत्वें गद्यात सांगण्यानें कर्णकटु वाटण्याचा संभव आहे, म्हणून तीं पद्यांत गोंविलीं गेल्यानें त्यांना अनिच्छतोऽपि रसिकांच्या रसनेवर बसणेचा मान मिळेल व सहजच कवीला अल्पांशानें कां होईना समाजसेवेचे भाग्य लाभेल यात संशय नाहीं. भाषांतरातील नीतितत्त्वामुळें हें पुस्तक आबालवृद्धांना उपयोगी व प्रिय होईल अशी आशा आहे. ता. २०।१।१९३२ इ.

# ‘ शतोपदेश ’ वरील कांहीं अभिप्राय.

रा. ब. कृ. ना. पंडितराव, बी.ए. एलएल्. बी., माजी सरन्यायाधीश, कोल्हापूरः—श्रीगुमानिकविप्रणीत “शतोपदेशप्रबंध” नामक संस्कृत ग्रंथाचें **समवृत्तांत रूपांतर** रा. बाबूराव वासुदेव **कारेकर, शिक्षक हरिहर विद्यालय,** कोल्हापूर यांनीं केलें असून तें **सुबोध व सरस** झालें आहे. मराठी भाषा संस्कृताप्रमाणें संग्राहक नसली तरी रा. कारेकर यांनीं मूळ संस्कृत आर्येचा अर्थ मराठींत एकाच आर्येंत उत्तम रीतीनें व्यक्त करण्याचा यत्न केला असून त्यावरून त्यांचें **काव्यरचनाचातुर्य स्पष्ट** दिसून येणार आहे. मूळासहित रूपांतराचा सर्व लहान थोर **विद्यार्थ्यांस उपयोग** होईल एवढेंच नव्हे तर **प्रौढ सुशिक्षित लोकांसही** तें **कौतुकास्पद** होईल. ता. १ फेब्रुवारी १९३२ इ.

विख्यात कादंबरीकार श्रीयुत **प. स. देसाई,** संपादक, रामकृष्ण निकेतन, मलकापूर ( कोल्हापूर ):—

कोल्हापूर येथील **सुप्रसिद्ध** कवि ‘वासुदेवसुत’ कारेकर यांनीं संस्कृत **शतोपदेशाचा** मराठींत केलेला पद्यानुवाद फारच उत्कृष्ट व सुबोध झाला आहे. यातील प्रत्येक आर्येंत एकेक कथानक गोंविलें असल्यामुळे शाळेंतील विद्यार्थ्यांना बुद्धिविकासाच्या दृष्टीनें याचा फारच उपयोग होणार आहे; व शिक्षकानाही प्रत्येक आर्या समजावून देताना पौराणिक कथांचा मनोरंजक पद्धतीने उपयोग करून तो विषय आकर्षक करण्याला संधि सापडणार आहे. **सदर पुस्तक** सरकारी **विद्याखात्यानें** शाळांसाठीं **मंजूर केल्यास** शालेय पुस्तकांत एका नवीन उपयुक्त पुस्तकाची भर पडणार आहे. ता. २७ जानेवारी १९३२.

**श्री. न. वि. कारेकर,** एम्. एससी., राजाराम कॉलेज, कोल्हापूरः—

श्री. ‘ गुमानि ’ कवीच्या शतोपदेशाचें मराठींत आर्यावृत्तात रचलेलें **भाषांतर फारच चांगलें** झालें आहे. हें पुस्तक **बालवाचकांना** सदासर्वकाळ पुराणकथांच्या आधारें **उपदेश करीलच.** शिवाय **तरुण व वृद्ध मंडळींसही सावधान** ठेवील. **पुस्तक संग्रहणीय** आहे. ९।२।३२.

---

विद्वन्मान्य ‘ भारत-कवि-मंडळा ’ चीं पुस्तकें अवश्य वाचा.

## ‘ शतोपदेश ’ वरील कांहीं अभिप्राय.

सुप्रसिद्ध कलाकोविद प्रो ना. सी. फडके, एम्. ए.:— श्री. वासुदेवसुत यांनीं गुमानिकवीच्या संस्कृत शतोपदेशप्रबंधास दिलेलें समवृत्तरूप मी पाहिलें, व तें पुष्कळच चांगलें साधलें आहे असें मला वाटलें. शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांनीं पाठ करून ठेवण्यासारखीं सुभाषितें या शंभर आर्यांतील प्रत्येकीच्या चतुर्थ चरणांत आहेत. हीं संस्कृत व वासुदेवसुताच्या यत्नानें उपलब्ध झालेलीं मराठी सुभाषितें विद्यार्थ्यांनीं पाठ केल्यास त्यांची बहुश्रुतता व काव्यप्रीति दोन्हींही अनायासें वाढतील. २४।३।३२.

रा. सा. आर्. जी. शिंदे, बी. ए., एल्एल्. बी., चीफ् ऑफिसर म्युनिसिपालिटि, कोल्हापूरः— श्रीगुमानिकविकृत संस्कृत प्रबंधासह ‘ वासुदेवसुत कारेकर ’ विरचित आर्याबद्ध शतोपदेश वाचला. मराठी वाङ्मयांत तो चांगलें स्थान मिळवील. मूळ संस्कृत काव्याचा आत्मा ‘ मराठी शतोपदेशांत ’ प्रतिबिंबित होऊन चांगला उतरला आहे. मूळांतील रस व अर्थ भिन्न भाषेंत व मूळवृत्तातच कायम ठेवणें कठिण असतें. पण तसेंही कठिण कार्य श्री. वासुदेवसुतांनीं सहज पण चांगलें साधलें आहे. संस्कृतांतील ज्ञान मराठीद्वारें प्रसृत करण्याचा श्री. कारेकराचा हा उपक्रम स्तुत्य व अनुकरणीय आहे. काव्याचा प्रमुख हेतु, सुहृदाप्रमाणें आनंद देऊन हितपरिणामी उपदेशानें उन्नति साधणें, शतोपदेशांत चांगला बठला आहे. हा शतोपदेश सर्वांनाच, विशेषतः विद्यार्थीवर्गाला चांगलाच उपयोगी पडेल. हें काव्य ‘भारत-कवि मंडळा’तर्फे प्रकाशित होत असल्यानें त्याचा उच्च दर्जा स्पष्टच दिसून येतो. A thing of Beauty is Joy forever या दृष्टीनेंही या ‘ काव्यमय शतोपदेशा ’ बद्दल श्री. कारेकर हे अभिनंदनास पात्र आहेत. १।४

REFBK-0004730

## कारेकर

शतोपदेश ( संस्कृत-मराठी ) ... ( मराठी ) किं. १॥ आणा., ताराबाईचा पोंवाडा किं. ॥ आणा., प्रेमपराग किं. ८ आणे. हृदयकमल (स्फुटकवितासंग्रह), नाट्यपंचक, जलाल जहर हीं पुस्तकें लौकरच प्रसिद्ध होतील. पत्ताः— बी. व्ही. कारेकर, C/o दत्तात्रय रामचंद्र पाटगांवकर, सराफ, गुजरी, कोल्हापूर सिटि.